**महाराष्ट्र विधानसभा**
**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ / फाल्गुन १९, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **कामगार मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री, महिला व बालविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३४**

---

**राज्यात महिलांसाठी राबविण्यात येणारी अस्मिता योजनेच्या सुधारित प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत**

**(१) * ५७२५४ श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिलांसाठी पाच रुपयात आठ सॅनिटरी पॅड देणारी अस्मिता योजना तत्कालीन ग्रामविकास मंत्री यांनी सन २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आणली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत सन २०१९ मध्ये ५० हजार बचत गटांनी विक्रीसाठी नोंदणी केली होती त्यापैकी जवळपास ४५ हजार बचत गटांना ऑर्डरही मिळाल्या होत्या परंतु माहे एप्रिल,२०२२ पासून कंत्राट संपल्याने सदर योजनेची अंमलबजावणी राज्यात बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अस्मिता योजनेची व्याप्ती, स्वरूप, पुरवठादार निवड, Logistic, इत्यादीबाबत सुधारणा करून योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सदर योजनेचा सुधारित प्रस्ताव शासन स्तरावर प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना सुरु करण्याबाबत महिलांमधून मोठया प्रमाणात मागणी होत असल्याने सदर योजनेच्या सुधारित प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १७ डिसेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करून तातडीन योजना सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे

(५) अस्मिता योजनेची व्याप्ती, स्वरुप, पुरवठादार निवड, Logistic इत्यादीबाबत सुधारणा करणे आवश्यक असल्याने योजनेच्या सुधारीत अंमलबजावणीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत केलेल्या कामांची कंत्राटदारांकडून वस्तू व सेवा कराची रक्कम कपात न केल्याबाबत**

**(२) * ५६९४८ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत केलेल्या कामांची कंत्राटदारांना दयावयाच्या रकमेत संबंधित कार्यकारी अभियंता यांनी वस्तू व सेवा कराची कपात न करता कंत्राटदारांना पूर्ण रक्कम देण्यात आल्यामुळे शासनाचे रु.२८ कोटी ६३ लाखांचे नुकसान झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंत्राटदारांकडून वस्तू व सेवा कराची रक्कम कपात न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत सदर कामांबाबत संबंधित कंत्राटदारांचे अंतिम देयक अदा करण्यापुर्वी शासकीय कंत्राट रकमेवर कराच्या बदललेल्या परिणामाबाबत वित्त विभागाने दि.१९.०८.२०१७ व दि.११.०९.२०१७ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसारच जी.एस.टी. रकमेचे समायोजन करुन त्याप्रमाणे देयक अदा करण्याची आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सर्व कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो), महाराष्ट्र ग्रामिण रस्ते विकास संस्था यांना कळविण्यात आले आहे.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत सदर कामांबाबत संबंधित कंत्राटदारांचे अंतिम देयक अदा करतांना नियमानुसार वस्तु व सेवा कराची कपात करुन कंत्राटदाराला देयके अदा केली जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लांजा (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यासह अनेक सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(३) * ५७६६७ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या लांजा (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांसह अनेक सुविधांचा अभाव असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयातील अपुऱ्या सुविधांमुळे रुग्णांवर किरकोळ उपचार केल्यानंतर त्यांना अधिक उपचारासाठी रत्नागिरी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ग्रामीण रुग्णालयासाठी शासनाकडून १५ कोटी रुपयांच्या निधीस तत्वतः मंजूरी मिळालेली

असतांनाही गेल्या २ वर्षापासून नवीन इमारत व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन लांजा ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांसह सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय लांजा हे ३० खाटांचे रुग्णालय असून तेथे निकषानुसार ओपीडी विभाग, प्रयोगशाळा, आयपीडी, आयसीटीसी, दंतविभाग, औषध विभाग, एनसीडी विभाग, आरबीएसके, आयुष विभाग, प्रसुती विभाग, क्षयरोग तपासणी, लसीकरण विभाग इ. सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. ग्रामीण रुग्णालय, लांजा येथे २८ पदे मंजूर असून त्यापैकी २१ पदे भरण्यात आलेली आहेत व ०७ पदे रिक्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना आरोग्य सेवा दिल्या जात आहेत. अत्यवस्थ रुग्णांना गरजेनुसार रत्नागिरी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात संदर्भित केले जाते.

(३) अंशत: खरे आहे.

दिनांक ०८.०१.२०२१ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण रुग्णालय, लांजा येथील मुख्य इमारतीच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर बांधकामाच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

(४) ग्रामीण रुग्णालय, लांजा येथे वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय अधिकारी, दंत शल्यचिकित्सक, नेत्रचिकित्सा अधिकारी, शिपाई, कक्षसेवक व दंतसहायक अशी ०७ पदे रिक्त असून सदरील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेचा मुद्रांक शुल्क अनुदानापोटी शासनाकडे निधी प्रलंबित असल्याबाबत

**(४) * ५६६३४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागपूर जिल्हा परिषदेचा सन २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीतील मुद्रांक शुल्क अनुदानापोटी शासनाकडे रुपये १०१ कोटी पेक्षा जास्त निधी प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नागपूर जिल्हा परिषदेने शासनाकडे वारंवार मागणी करूनही अद्याप हा निधी देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त निधी जिल्हा परिषदेला न मिळाल्याने जिल्हा परिषदेची अनेक विकास कामे ठप्प झाली असून त्यात शाळा बांधकामे व दुरुस्ती, उपकेंद्रे बांधकामे व दुरुस्ती यासारखी जनहिताची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन सदर निधी नागपूर जिल्हा परिषदेला तात्काळ देण्यासाठी तसेच महसूल विभागामध्ये प्रलंबित असलेला निधी देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) सन २०२२-२३ मधील अर्थसंकल्पीत निधी जिल्हा परिषदांना उपलब्ध करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत भूमिहिनांना अद्याप घरकुले मिळाली नसल्याबाबत**

**(५) * ५७२९६ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), ॲड.अशोक पवार (शिरुर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने ग्रामीण भागातील २.९५ कोटी नागरीकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मुलभूत सुविधांसह घरे बांधून देण्याचे माहे मार्च, २०२४ पर्यंत उद्दिष्ट गाठण्याची मुदत ठरविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या निकषानुसार ज्या लाभार्थ्यांच्या मालकीच्या जमिनीचा तुकडा नाही त्या भूमिहिनांना जमीन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित राज्य शासनावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेअंतर्गत राज्यात एक लाखाहून अधिक भूमिहिन घरकुलासाठी पात्र असतांना त्यांना घरकुले दिली जात नसल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने त्याबाबत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

राज्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत एकूण १२९७०५ भूमिहीन लाभार्थ्यांपैकी ६८२५५ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऊर्वरित ६१४५० लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) राज्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे :-

१. पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत ५०० चौ.फु. पर्यंत जागा खरेदी करण्यासाठी रु.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य देणे.

२. दि.०१.०१.२०११ पूर्वीची निवासी जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे.

३. शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करुन देणे.

४. इतर मार्गाने (भाडेपट्टा, बक्षिसपत्र इत्यादि) जागा उपलब्ध करुन देणे. तसेच, अमृत महा आवास अभियानांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे हा उपक्रम अग्रक्रमावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद ( धाराशिव ) येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयात पायाभूत सुविधांची कमतरता पूर्ण करण्याबाबत

**(६) * ६१२४८ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयामध्ये अपुरा कर्मचारी वर्ग, महाविद्यालयातील पायाभूत सुविधांची कमतरता या निकषांवर आधारित राज्यातील पाच शासकीय आयुर्वेदिक महाविद्यांलयामध्ये प्रथम वर्ष विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेची परवानगी नाकारल्याचे राष्ट्रीय भारतीय चिकित्सा पद्धती परिषद यांनी कळविले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महाविद्यालयांमध्ये धाराशिव, मुंबई, जळगाव, नांदेड, नागपूर येथील महाविद्यांलयाचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उस्मानाबाद (धाराशिव) येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील त्रुटींची पूर्तता करून प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रिया पूर्ववत करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, येथील अपुरा कर्मचारी वर्ग व पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे पदव्युत्तर प्रवेश क्षमता ४८ असताना सुद्धा फक्त २१ प्रवेश झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, येथे अपुऱ्या कर्मचारी वर्गाची पूर्तता करण्यासाठी ११ महिन्यांसाठी कंत्राटी पद्धतीने कर्मचारी वर्ग भरला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, येथे पूर्णवेळ कर्मचारी वर्ग तसेच पायाभूत सुविधांची कमतरता पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शासकीय आयुर्वेद महाविद्यालय उस्मानाबाद येथे EWS धरून प्रवेश क्षमता ६२ असून ५१ विद्यार्थी यांना प्रवेश देण्यात आला आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) आयुष संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील सरळसेवेने भरावयाच्या अध्यापकांचे संवर्गनिहाय आरक्षण निश्चिती करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. आरक्षण निश्चिती झाल्यानंतर

सरळसेवेची रिक्त पदे भरण्याचे प्रस्तावित आहे. तसेच पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदावर पदोन्नती देण्याची कार्यवाही सुरू आहे.

अध्यापक संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत विद्यार्थी हित व रूग्णसेवा बाधीत होऊ नये याकरीता ही रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यात हत्तीरोग रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याबाबत**

**(७) * ५८३४४ श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हत्तीरोगाचे सर्वाधीक रुग्ण चंद्रपूर जिल्ह्यात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णवाढ होण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, हत्तीरोगाचे समूळ उच्चाटन करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

जानेवारी २०१८ ते जानेवारी २०२३ पर्यंत या ५ वर्षाच्या कालावधीत रुग्ण संख्या प्रत्येक वर्षी कमी झाल्याचे आढळून येते.

| जिल्हाचे नाव | वर्ष | एकूण |
|---|---|---|
| चंद्रपूर | २०१८ | १७४४५ |
| | २०१९ | १६२०२ |
| | २०२० | १४१४६ |
| | २०२१ | १२६४३ |
| | २०२२ | १३४४७ |

जानेवारी २०१८ मध्ये चंद्रपूर जिल्हयात एकूण १७४४५ हत्तीपाय व अंडवृध्दी रुग्ण होते व जानेवारी २०२३ अखेरपर्यंत जिल्हयात १३४४७ हत्तीपाय व अंडवृध्दी रुग्ण आहेत. एकदा हत्तीपाय झाल्यास तो आयुष्यभर राहतो. तसेच हत्तीरोगावरील विविध उपाययोजनांमुळे नवीन रुग्णदर अत्यंत कमी झालेला आहे.

| जिल्हाचे नाव | वर्ष | नवीन रुग्ण | MF दर |
|---|---|---|---|
| चंद्रपूर | २०१८ | ६३० | ०.४ |
| | २०१९ | ६१६ | ०.४ |
| | २०२० | ३१६ | ०.२ |
| | २०२१ | १९८ | ०.१ |
| | २०२२ | १८९ | ०.१ |

(३) हत्तीरोगाचे समूळ दूरीकरण करणेसाठी शासनाने खालील उपाययोजना केलेल्या आहेत-

१. चंद्रपूर जिल्हयात ४ उपजिल्हा रुग्णालय, ९ ग्रामीण रुग्णालय, ६३ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३३९ उपकेंद्रा मार्फत हत्तीपाय व अंडवृध्दी रुग्णांची नियमित तपासणी व उपचार करण्यात येतात.

२. तसेच जिल्हयात सध्या ४ रात्रकालीन चिकित्सालय तसेच २ हत्तीरोग नियंत्रण पथक कार्यरत आहेत यांच्यामार्फत रात्र सर्वेक्षण करून रक्तनमुने घेतले जातात व रुग्णांना औषधोपचार करण्यात येतात.

३. सामुदायिक औषधोपचार मोहिम- सामुदायिक औषधोपचार मोहिमेत सन २०२१ मध्ये १९८४१०२ लोकांना हत्तीरोग प्रतिबंधक गोळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. सन २०२३ या वर्षी १० फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२३ कालावधीत सामुदायिक औषधोपचार मोहिम (आयडीए) राबविण्यात आलेली आहे.

४. विकृती व्यवस्थापन - चंद्रपूर जिल्ह्यातील हत्तीरोग रुग्णांना सन २०२१ मध्ये ९७६८ व सन २०२२ मध्ये १०३८० विकृत्ती व्यवस्थापन (MMDP) कीटचे वाटप करण्यात आलेले आहे.

५. अंडवृध्दी शस्त्रक्रिया - चंद्रपूर जिल्ह्यात सन २०२१ मध्ये ९५६ व सन २०२२ मध्ये ६३० इतक्या अंडवृद्धी शत्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

६. नियमित उपचार - नियमित विशेष मोहीम तपासणीत आढळून आलेल्या हत्तीरोग संक्रमित रुग्णांची पडताळणी करून सदर रुग्णांना हत्तीरोग प्रतिबंधक गोळीचा नियमित उपचार देऊन समुपदेशन करण्यात आले.

७. डास नियंत्रण - डास नियंत्रणाकरिता कीटकशास्त्रीय सर्वेक्षण करून आढळून आलेले डास अळी दूषित कंटेनर रिकामे करणे तसेच डासोत्पत्ती स्थानामध्ये गप्पी मासे सोडणे, कोरडा दिवस पाळणे, डास विरोधी क्रीम, अगरबत्ती, मॅट इ. चा वापर करून डासांपासून संरक्षण करणे या बाबत आरोग्य शिक्षण देण्यात येते.

८. डासापासून संरक्षण करण्यासाठी कीटक नाशकासह मच्छरदाण्यांचे वाटप करण्यात येते.

९. रात्र सर्वेक्षण - यामध्ये हत्तीरोग संक्रमण भागातील रक्त नमुने रात्रीच्या वेळी घेऊन तपासण्यात येतात.

११. अळीनाशक फवारणी- कार्यक्षेत्रातील निवडक हत्तीरोग ग्रस्त भागात क्षेत्रकर्मचाऱ्यांमार्फत डासांवर नियंत्रण ठेवण्याकरिता ॲबेट, बीटीआय पावडर या रसायनांचा वापर करून डासोत्पती स्थानांत फवारणी करण्यात येते.

११.कीटकशास्त्रीय सर्वेक्षण- उपलब्ध किटक समाहारकांच्या मार्फत कार्यक्षेत्रातील निवडक भागातील घरामध्ये डास पकडून त्याचे वर्गीकरण करणे, डास घनता काढणे, डासांचे विच्छेदन करणे व डासोत्पत्ती स्थाने तपासणे. इत्यादी कार्यवाही करण्यात येते.

१२. जीवशास्त्रीय उपाययोजना - गप्पी मासे सोडण्या योग्य स्थान उदा. बिनवापराच्या विहिरी, टाकी, कारंजे, मोठे तलाव, मोठे नाले, इत्यादी ठिकाणी गप्पी मासे सोडून डासांची उत्पत्ती कमी केली जात आहे.

१३. आरोग्य शिक्षण- कार्यक्षेत्रातील जनतेस विविध माध्यमद्वारे व प्रत्यक्ष भेटी मध्ये हत्तीरोगाचे कारण, प्रसाराचे कारण, डासोत्पती, औषधोपचार, प्रतिबंधात्मक उपाय इत्यादी बाबत आरोग्य शिक्षण दिले जाते. इ. उपाय योजना राबविल्या जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व आसपासच्या विभागांमध्ये गोवर आजाराचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना

**(८) * ५७०१२ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व आसपासच्या विभागांमध्ये गोवर रोगाचे संक्रमण वाढत असून या आजारावरील लसीचे प्रमाण सन २०२२ मध्ये कमी झाल्यामुळे लहान मुलांच्या मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या अहवालानुसार ० ते ५ वर्ष वयोगटातील ४०९, ५ ते ९ वर्ष १०९, १० ते १४ वर्ष वयोगटातील १५ तर १५ वर्षाहून अधिक वयोगटातील २२ जणांना गोवर रोगाने संक्रमित केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही  खरे आहे काय,
(३) असल्यास, गोवरचा उद्रेक असलेल्या भागातील बहुतांश लोकसंख्या ही अल्पसंख्याक, अन्य राज्यातून स्थलांतरित झालेली असल्याने त्यांच्याशी गोवर लसीकरणासंदर्भात संवाद साधताना आशा सेविकांना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, मुंबईतील अनेक विभागांमधून गोवर प्रतिबंधक लसीकरण नाकारण्यात आले असून कमी प्रमाणात होणाऱ्या लसीकरणामुळे गोवर प्रतिबंधक लसीकरणासाठी नेमलेल्या कामगारांना कामावरून कमी केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या आजाराचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात गोवर रोगाचे संक्रमण वाढत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे.

गोवर रोगामुळे सन २०२२ मध्ये ११ व सन २०२३ मध्ये दिनांक २१.०२.२०२३ पर्यंत ४ मृत्यू झाले असल्याचे मत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मृत्यू संशोधन समितीने दिले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) आशा स्वयंसेविका व आरोग्य स्वयंसेविका यांना लसीकरण कार्यक्रमासाठी जनसमुदायाशी सुसंवाद साधण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) गोवर प्रतिबंधक लसीकरणासाठी नवीन कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले नाहीत. सदर लसीकरणाचे कामकाज महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) गोवर आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

• ताप व पुरळ रुग्णांचे सक्रीय सर्वेक्षण, ताप व पुरळ असलेल्या रुग्णास जीवनसत्व “अ” च्या दोन मात्रा २४ तासांच्या अंतराने देण्यात येत आहेत.

• गोवर संशयित रुग्णांना आवश्यकतेनुसार रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

• नियमित लसीकरण कार्यक्रमासोबत अतिरिक्त लसीकरण सत्रांचे व जोखीमग्रस्त भागात फिरते लसीकरण सत्रांचे आयोजन करण्यात येत आहे.

• लसीकरणांपासून वंचित राहिलेल्या बालकांसाठी विशेष लसीकरण मोहिमेच्या दोन फेऱ्या राबविण्यात आल्या आहेत.

• गोवर उद्रेक असलेल्या आरोग्य केंद्रांत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ९ महिने ते ५ वर्षे वयोगटातील गोवर रुबेला लसीची अतिरिक्त मात्रा व ९ महिन्यांपेक्षा कमी वयाच्या बालकांमध्ये गोवर निश्चित रुग्णांचे प्रमाण १० टक्के पेक्षा जास्त असलेल्या आरोग्य केंद्रांत ६ महिने ते ९ महिने वयोगटातील बालकांना गोवर रुबेला लसीची शून्य मात्रा देण्यात येत आहे.

• सदर आजाराच्या लोकजनजागृतीसाठी खाजगी डॉक्टर, धर्मगुरु / इतर प्रभावी व्यक्ती यांना गोवर आजार तसेच लसीकरणाविषयी अवगत करुन पालकांमध्ये लसीकरणाविषयी सकारात्मक बदल घडवून मुलांचे लसीकरण करुन घेण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात "मिशन वात्स्यल्य" योजने अंतर्गत अनुदानात वाढ तसेच "पंडिता रमाबाई व्याजमाफी" योजना अंमलात आणण्याबाबत

**(९) * ५६७४२ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.छगन भुजबळ (येवला), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनामुळे कुटुंबातील पती गमावलेल्या महिलांच्या उपजीविकेसाठी तसेच माता किंवा पितृ छत्र हरपलेल्या अनाथ बालकांच्या संगोपनासाठी शासनाकडून "मिशन वात्सल्य" योजनेअंतर्गत बालसंगोपन योजनेकरीता मिळणारी रक्कम प्रतिमहिना रु ११००/- वरुन रु.२५००/- करण्याचे तत्कालिन उप मुख्यमंत्री तसेच महिला व बालविकास मंत्री यांनी आश्वासित केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच,महिलांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी राज्यात "पंडिता रमाबाई व्याजमाफी" योजना घोषित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही योजनेंबाबत आश्वासित करुनही त्यांची अद्यापही शासनमार्फत अंमलबजावणी सुरु झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त "पंडिता रमाबाई व्याजमाफी" तसेच "मिशन वात्सल्य" योजनेअंतर्गत रु.२५००/- अनुदान वाढ करणेबाबत शासनस्तरावर तात्काळ निर्णय घेऊन त्यासाठी निधी उपलब्धतेसह अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) होय, हे खरे आहे,

(३) हे अंशत: खरे आहे,

बालसंगोपन योजनेच्या सहायक अनुदानामध्ये वाढ करण्यात आली असून सदर वाढीव लाभ दि.१ एप्रिल, २०२३ पासून लागू राहील.

'पंडिता रमाबाई स्मृती शताब्दी महिला उद्योजक योजना' याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(४) बालसंगोपन योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या सहायक अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत दि.३१.१.२०२३ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतचा शासन निर्णय क्र. बालसं-२०२२/प्र.क्र.७६/का-८ दि.१७/२/२०२३ निर्गमित करण्यात आला आहे.

तसेच उद्योग विभागामार्फत उद्योजकांसाठी विशेष धोरण, २०१७ व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे अभिप्राय उद्योग विभागाने दिले असून योजनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी महिला व

बाल विकास विभागामार्फत 'पंडिता रमाबाई स्मृती शताब्दी महिला उद्योजक योजना' राबवावी किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) पंचायत समिती पाणीपुरवठा विभागाअंतर्गत ठेकेदारांनी शासनाच्या निधीत केलेला गैरव्यवहार

**(१०) * ६१६४५ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) पंचायत समिती पाणीपुरवठा विभागात सन २०१६ ते २०१८ या कालावधीत जलयुक्त शिवार अभियान,राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व देखभाल दुरुस्ती निधी या योजनांमध्ये संबंधित कंत्राटदारांना तालुक्यातील २० गावांमध्ये विहिर बांधण्याचे व दुरुस्तीची कामे देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंत्राटदारांनी कामे न करताच बनावट अहवाल सादर करुन शासनाची १ कोटी १९ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गणेश कृपा कन्स्ट्रक्शन (मुरबाड), बुधराणी धर्मू इंदनदास (उल्हासनगर), अघई ग्रामपंचायतीचे सरपंच व अन्य तीन अशा सहा ठेकेदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित कंत्राटदारांची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) सदर कामांचे कंत्राट गणेशकृपा कन्स्ट्रक्शन, बुधराणी धर्मू इंदनदास, सरपंच ग्रामपंचायत अघई, सिध्दी प्रदीप देशमुख, मनिष गोविंद भेरे, प्रितम गोविंद भेरे यांना ई-निविदा पध्दतीने देण्यात आलेले होते. कामे पुर्ण झाल्यानंतर शासकीय तंत्रनिकेतन बांद्रा, मुंबई या त्रयस्थ तपासणी संस्थेचे बनावट साहित्य तपासणी अहवाल त्यांनी सादर केल्याने संबंधित कंत्राटदारांविरुध्द दि.१७.०१.२०२३ रोजी शहापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण पोलीस यांच्याकडून संबंधित कंत्राटदाराची चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा (जि.वर्धा) येथील मजूर कामगार इमारत व बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या कार्यालयामार्फत अनुदान वाटपात झालेला अपहार

**(११) * ६२१८१ डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा (जि.वर्धा) येथील मजूर कामगार इमारत व बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या कार्यालयामार्फत १८ हजार २०० बांधकाम कामगारांना २३ कोटी ५ लाख ६५ हजार रुपयांचे अनुदान वाटपात जवळपास रुपये ६ कोटीचा आर्थिक अपहार केल्याचे गुन्हे शाखेच्या तपासात स्पष्ट झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी बोगस कामगार दाखवून सहा कोटी रुपयांचा अपहार झाल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने तत्कालीन कामगार अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्हयातील २६ बांधकाम कामगार संघटना अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव हे संशयीत आढळून आले असून त्यातील चार जणांना अटक करण्यात आली होती, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणातील तपास अद्यापही संथगतीने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबांची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या अनुदान वाटपात वर्धा येथील कार्यालयामार्फत केलेल्या कार्यवाहीमध्ये आर्थिक अपहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे.
(२) सदर आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी संबंधित ५ पैकी ४ जणांना अटक केली असून एकाचा मृत्यु झालेला आहे.
(३) कामगार आयुक्त, मुंबई यांनी त्यांच्या दि.०९.०९.२०२० आदेशान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळा अंतर्गत तत्कालीन सरकारी कामगार अधिकारी, वर्धा यांच्यामार्फत दिनांक १४.०५.२०२० ते दिनांक ०९.०९.२०२० या कालावधीत मोठया प्रमाणात केलेली बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व निधीचे वाटप याबाबतची चौकशी करण्यासाठी कामगार उपायुक्त, अमरावती (सेवानिवृत्त) यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमली .

सदर चौकशी समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक ०१.०३.२०२१ अन्वये सदर प्रकरण चौकशीसाठी पोलीस विभागाकडे सोपविण्यात आले.

त्यानुसार तत्कालीन सरकारी कामगार अधिकारी,वर्धा व इतर ४ यांचेविरुध्द रामनगर पोलीस स्टेशन, वर्धा येथे दि.२३.०४.२०२१ रोजी प्रथम खबरी अहवाल (FIR) क्र.०२२५/२०२१ दाखल केला आहे.

सद्यस्थितीमध्ये सदर प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा,वर्धा कार्यालयामार्फत सुरु आहे.
(४) तत्कालीन सरकारी कामगार अधिकारी व तत्कालीन सुविधाकार यांचेविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ व १२ अन्वये कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर येथील निरीक्षण गृहातील अल्पवयीन मुलीवर झालेला अत्याचार

**(१२)** * **६१९७३ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर येथील महिला व बालविकास विभागाच्या निरीक्षणगृहातील एका अल्पवयीन मुलीला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर अत्याचार केला असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी मुलीच्या मैत्रिणीसह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी संबंधित निरीक्षणगृहातील कुठल्याही कर्मचारी / अधिकारी यांचे विरुद्ध कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे,
(२) व (३) संबंधित निरीक्षणगृहाचे अधीक्षक यांनी या प्रकरणाच्या अनुषंगाने दाखल केलेल्या अहवालानुसार सदर निरीक्षणगृहाचे लिपीक व काळजी वाहक यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील विडी कामगार कल्याण महामंडळाच्या अखत्यारीतील दवाखाने बंद पडल्याने कामगारांची होत असलेली गैरसोय

**(१३) * ५९०८७ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अडीच लाख विडी कामगार असून त्यापैकी ९९ % महिला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या निधीअभावी विडी कामगार कल्याण महामंडळ बंद पडल्यामुळे विडी कामगारांच्या कल्याणाच्या अनेक योजना तसेच महामंडळाच्या अखत्यारीतील दवाखाने बंद पडल्यामुळे कामगारांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र राज्यातील विडी कामगारांच्या योजनेतील दवाखाने बंद करण्याच्या निर्णयाविरोधात विडी कामगार महासंघाच्यावतीने पुणे येथील सोनवणे हॉस्पिटल समोर आंदोलन करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आरोग्यासाठीच्या योजना राज्य कामगार विमा मंडळाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या मात्र या मंडळाला विडी उद्योगचालक त्यांचा वाटा जमा करणार की नाही याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विडी कामगारांच्या आरोग्याच्या तसेच हिताच्या अन्य योजना पुन्हा सुरू करण्याबाबत व त्यासाठी निधीची तरतूद करुन आवश्यकता भासल्यास केंद्राकडे पाठपुरावा करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) कामगार कल्याण संघटना ही केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाच्या अखत्यारीत असून त्यांच्या अहवालानुसार राज्यातील त्यांच्या अधिनस्त १६ दवाखान्यांमध्ये एकूण १,३९,७३२ विडी कामगार नोंदित असून त्यापैकी बहुसंख्य विडी कामगार महिला आहेत.

(२) कामगार कल्याण संघटनेच्या अखत्यारीतील दवाखाने बंद झालेले नसल्याने त्यामुळे कामगारांची गैरसोय होत नाही, असे केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाने कळविले आहे.

(३), (४), (५) व (६) कामगार कल्याण संघटनांचे (LWO) रुग्णालये/ डिसपेंन्सरी, पुणे याचे हस्तांतरण राज्य कामगार विमा महामंडळ (ESIC) योजनेतील रुग्णालयात करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. या निर्णयाच्या विरोधात विडी कामगार संघ, पुणे यांनी विडी कल्याण निधी डिसपेंन्सरी, पुणे येथे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी आंदोलन केले होते.

विडी कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९७६ केंद्र शासनाच्या दिनांक ५ मे, २०१७ रोजीच्या राजपत्राद्वारे (असाधारण भाग II) रद्द करण्यात आला असल्याने विडी उद्योगचालक त्यांचा वाटा मंडळाला जमा करण्याचा प्रश्न येत नाही.

कामगार कल्याण संघटनेमार्फत (LWO) चालवली जाणारी रुग्णालये/ डिसपेंन्सरी कार्यरत राहणार असल्याने विडी कामगार वैद्यकीय सुविधांपासून वंचित राहणार नाहीत. तसेच उत्पादित विडीवर आता कोणतीही

कर आकारणी आणि उपकर वसूल केला जात नसला तरी कामगार कल्याण संघटनांची (LWO) रुग्णालये /डिसपेंन्सरी चालवण्यासह कल्याणकारी योजनांवरील खर्चाची पूर्तता करण्यासाठी केंद्र सरकारच्या एकत्रित निधीतून निधी उपलब्ध करून दिला जातो.

-----------------

## पालघर जिल्ह्यांतर्गत मुंबई-अहमदाबाद महामार्गावर प्रस्तावित असलेले टाकवहाल येथील ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित करण्याबाबत

**(१४) * ५८६८१ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यांतर्गत मुंबई-अहमदाबाद महामार्गावर होणाऱ्या अपघातातील जखमींसह जिल्ह्यातील गरजू रुग्णांसाठी प्रस्तावित असलेले टाकवहाल येथील दोनशे रुग्णशय्येचे ट्रॉमा केअर सेंटर अद्यापी कार्यान्वीत झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ट्रॉमा केअर सेंटरच्या बांधकामाच्या विलंबाची कारणे काय आहेत

(३) असल्यास, उक्त ट्रॉमा केअर सेंटर तातडीने कार्यान्वीत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक १५.०४.२०१७ च्या शासन निर्णयान्वये, ग्रामीण रुग्णालय, मनोरचे श्रेणीवर्धन करुन २०० खाटांचे रुग्णालय व ट्रामा केअर युनिट मुख्य इमारत बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. सदर रुग्णालयाचे बांधकाम सन २०१९ पासून एकत्रितपणे सुरु करण्यात आले. परंतु करोना कालावधीत लॉकडाऊन लागू केल्याने इमारतीचे बांधकाम बंद होते. २०० खाटांचे सामान्य रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर युनिट इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले असून सद्दस्थितीत ६० टक्के बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) २०० खाटांचे सामान्य रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर युनिट इमारतीचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच ग्रामीण रुग्णालय, मनोरचे श्रेणीवर्धन करुन २०० खाटांचे रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर युनिट इमारत बांधकामाचे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यातील वडगाव, पोटा परिसरातील अनेक ग्रामंपचायती मधील नागरिकांना शुध्द पाणीपुरवठा करणेबाबत

**(१५) * ५८७८६ श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यातील वडगाव, पोटा परिसरातील अनेक ग्रामपंचायतीमधील शुध्द व स्वच्छ पाणी पुरवठा करणारे प्लॅन्ट बंद असल्याने नागरिकांना अशुध्द पाणी पुरवठा होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंद असलेले आर-ओ प्लॅन्ट पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदर प्रकरणी उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग हदगाव यांचे मार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.

हिमायतनगर तालुक्यात ३९ ग्रामपंचायतीमध्ये शुद्ध पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने एकूण ४० जलशुद्धीकरण संयंत्रे बसविण्यात आली होती. त्यापैकी ५ संयंत्रे विंधण विहिरींचे पाणी कमी झाल्यामुळे व ६ संयंत्रे देखभाल-दुरुस्तीअभावी बंद होती.

देखभाल-दुरुस्तीअभावी बंद ६ संयंत्रांपैकी १ संयंत्र तर पाण्याअभावी बंद असलेल्या ५ संयंत्रांपैकी ३ संयंत्रे कार्यरत करण्यात आलेली असून, उर्वरीत ७ संयंत्रे चालू करणेबाबतची कार्यवाही ग्रामपंचायतींकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बी.एस.सी. पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याबाबत

**(१६) * ५६९८० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बी.एस.सी. पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी वैद्यकीय, दंत, बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या बरोबरीने रुग्णालयात इंटर्नशिप कालावधीत रुग्णसेवा देत असूनही त्यांना कोणतेही विद्यावेतन देण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना संसर्गाच्या काळातही पॅरामेडिकलच्या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय सेवेतील विद्यार्थ्यांप्रमाणेच सेवा बजावली असल्याने त्यांना कोरोना काळापासून विद्यावेतन लागू करावे अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पॅरामेडिकलच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याचा निर्णय न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, त्यांना विद्यावेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत .

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय.

(२) कोरोना कालावधीत विद्यावेतन मिळण्याबाबत निवेदन प्राप्त आहे.

(३) व (४) सदर प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रुप ग्रामपंचायत निडी तर्फे अष्टमी (ता.रोहा, जि.रायगड) येथील प्राथमिक शाळेच्या दुरूस्तीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१७) * ६११६९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रुप ग्रामपंचायत निडी तर्फे अष्टमी (ता.रोहा, जि.रायगड) येथील प्राथमिक शाळेच्या दुरूस्तीच्या कामात लाखो रूपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा दुरूस्तीच्या कामासाठी शासनाकडून मिळालेला निधी खाजगी शाळेवर खर्च केल्याचे दाखवून संबंधित ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवक व सरपंच यांनी आर्थिक अपहार केल्याचे गटविकास अधिकारी यांनी माहितीच्या अधिकारात सांगितले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचे उघड होवूनही रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व रोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ग्रामसेवक व सरपंचावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) नाही, हे खरे नाही .

(२) नाही, हे   खरे नाही .

(३) प्रश्न उद्भवत नाही .

(४) प्रश्न उद्भवत नाही .

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुलांना मिळणारे अनुदान वाढवून मिळण्याबाबत**

**(१८) * ५९१७५ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली),श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य शासनाच्या प्रधानमंत्री आवास व रमाई आवास या दोन्ही घरकुल योजनेत शहरातील लाभार्थ्यांना रुपये दोन लाख पन्नास हजार तर ग्रामीण भागात रुपये एक लाख वीस हजार इतके अनुदान दिले जात असून त्यात दुप्पट रक्कमेची तफावत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वास्तव्यात बांधकामाचे साहित्य व मजूरी यांचे दर दोन्हीकडे जवळजवळ सारखेच असून याउलट ग्रामीण भागात हा खर्च जास्त येतो असे असतानाही अनुदानाच्या तफावतीमुळे घरकुलाचे बांधकाम अर्धवट ठेवण्याची वेळ लाभार्थ्यांवर येत आहे, हे   ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू योजनेअंतर्गंत मिळणाऱ्या अनुदानात वाढ करुन ग्रामीण व शहरी भागात मिळणाऱ्या अनुदानातील तफावत दुर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२)  हे खरे नाही.

(३) प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांच्या अनुज्ञेय अनुदानात रु. २.५० लक्ष वाढ करण्याबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे दिनांक २५.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असता केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ०२.१२.२०२० च्या पत्रान्वये अशी कुठलीही वाढ करता येत नाही, असे कळविले आहे. तदनंतरही दिनांक ०१.०८.२०२२ रोजी पुन्हा केंद्र शासनाकडे अनुदान वाढीची मागणी केली आहे. यासंदर्भात केंद्र शासनाकडून अद्याप प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

(४)  प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्करोगाची पूर्वावस्था (प्री कॅन्सर) या आजाराचा जन आरोग्य आयुष्यमान योजनेत समावेश करण्याबाबत

**(१९) * ५७७१२ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिलांच्या आरोग्याच्या समस्या जाणून घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने संजीवनी हे अभिनव अभियान राबविण्यात येत असून त्यात लातूर जिल्ह्यातील ११६ महिलांना कर्करोगाची पूर्वावस्था (प्री कॅन्सर) असल्याचे निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्करोगाची पूर्वावस्था याच्या उपचारासाठी जन आरोग्य आयुष्यमान योजनेत समावेश नसल्याने सदर गरीब महिला उपचारापासून वंचित राहिल्या असल्याचे माहे जानेवारी,२०२३ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जन आरोग्य आयुष्यमान योजनेत कर्करोगाची पूर्वावस्था (प्री कॅन्सर) या आजाराचा समावेश करून राज्यातील सर्व जिल्ह्यातील महिलांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) व (४) महिलांमधील प्री कॅन्सर (कर्करोग पूर्वावस्था) या आजारावर उपचार करणेसाठी एकत्रित महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत “LLETZ (large loop excision of the transformation zone)” या उपचारांचा समावेश केलेला आहे. त्यामुळे लाभार्थी महिला या उपचारांचा लाभ घेऊ शकतात. सबब, लाभार्थी महिला या उपचारापासून वंचित राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत कार्डधारकांना आरोग्याशी संबंधीत लाभ घेण्यास येत असलेल्या अडचणी

**(२०) * ५८४२६ श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आयुष्यमान भारत योजना या केंद्र शासनाच्या योजनेमधुन कार्डधारकांना आरोग्याशी संबंधीत लाभ घेण्यास अडचणी येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आयुष्यमान भारत कार्डधारक रुग्णांना वैद्यकीय उपचार, शस्त्रक्रीयेचा लाभ मिळत नाही परंतु अन्य राज्यातील कार्डधारकांना विदर्भातील नामांकीत रुग्णालयामध्ये उपचार सुरु असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील नागरीकांसाठी वैद्यकीय योजनेअंतर्गत महात्मा फुले जन आरोग्य योजना, पंतप्रधान वैद्यकीय सहायता योजना व मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता योजना सुरु असुन यामध्ये हिप रिप्लेसमेंट, ब्रेन सर्जरी इत्यादी आजारांचा समावेश नसण्याच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहेत काय,

(४) असल्यास, अन्य योजनेप्रमाणे राज्यातील कार्डधारक रुग्णांना उक्त योजनांतर्गत हिपरिप्लेसमेंट, ब्रेन सर्जरी, किडणी, लिव्हरशी संबंधीत शस्त्रक्रिया व उपचार समाविष्ट करुन लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्रातील रुग्णांना आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत उपचार, शस्त्रक्रियेचा लाभ मिळत आहे. २३ सप्टेंबर २०१८ पासून आजपर्यंत राज्यातील आयुष्यमान कार्ड धारक एकुण १,११,०९४ रुग्णांनी योजनेचा लाभ घेतला आहे. अन्य राज्यातील रुग्णांना आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत असलेल्या पोर्टेबिलीटी सुविधेनुसार महाराष्ट्रात उपचार दिला जातो.

तसेच आजपर्यंत आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत असलेल्या पोर्टेबिलिटी सुविधेनुसार अन्य राज्यातील लाभार्थ्यांवर एकूण ३६९९१ उपचार महाराष्ट्रातील अंगीकृत रुग्णालयामध्ये झालेले असून त्यापैकी विदर्भातील अंगीकृत रुग्णालयात २१६७४ उपचार झालेले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत हिपरिप्लेसमेंटचे ६ उपचार, ब्रेन सर्जरीसाठी ७९ उपचार, किडनी संबंधित ८३ उपचार व लिव्हर संबंधित १८ उपचार उपलब्ध आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(२१) * ५६८३८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निवासी डॉक्टरांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य निवासी डॉक्टर राज्य संघटनाने ( मार्ड) संप पुकारून आंदोलन केले असल्याचे दिनांक ३ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंदोलनामुळे राज्यातील ३०००० पेक्षा जास्त नियोजित शस्त्रक्रिया होऊ न शकल्यामुळे अनेक रुग्णांना प्राण गमवाले लागले तर अनेक ठिकाणी आरोग्य सुविधा विस्कळीत झाली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवासी डॉक्टरांच्या सर्व मागण्या पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दि.०६.०१.२०२३ च्या शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या आस्थापनेवर मानधन तत्वावरील वरिष्ठ निवासी संवर्गात एकूण १४३२ पदे निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. निवासी डॉक्टरांच्या इतर मागण्यांबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाट येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत

**(२२) * ६०३२४ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटसारख्या अतिदुर्गम व इतर आदिवासी भागामध्ये कुपोषण व इतर आरोग्य समस्यांचे मोठे प्रमाण असल्याने येथे ४ प्राथमिक आरोग्य केंद्र , १३ प्राथमिक आरोग्य उपकेंद्राना दिनांक १४ जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास मंजुरी मिळाली असून या नवीन इमारत बांधकामासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,धारणी या विभागाकडे नियमित पत्रव्यवहार केला असून देखिल अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागासाठी शासन कोटयावधी रुपयांचा निधी राखून ठेवत असून देखील आरोग्याशी संबंधित बाबीवरील प्रकल्पासंदर्भात विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेळघाट येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध करून करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अशंत: खरे आहे.

मेळघाट येथे शासन निर्णय दि. १४.०१.२०२२ अन्वये मंजुर करण्यात आलेल्या ०४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १३ उपकेंद्राना बांधकामाकरिता जागा मिळणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र दि. ०३.०३.२०२२ अन्वये मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांना अवगत करण्यात आले आहे. त्यानुषंगाने तालुका आरोग्य अधिकारी, धारणी व चिखलदरा यांच्या स्तरावरुन उपविभागीय अधिकारी, महसुल विभाग, धारणी यांच्या समन्वयाने जागा उपलब्धतेबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

(३) तालुका आरोग्य अधिकारी, धारणी व चिखलदरा यांच्या स्तरावरुन उपविभागीय अधिकारी, महसुल विभाग, धारणी यांच्या समन्वयाने जागा उपब्धतेबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालकांची काळजी घेणाऱ्या निवासी व इतर संस्थामध्ये बालकांचे मृत्यू झाल्याबाबत

**(२३) * ५९७४० श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची काळजी घेणा-या निवासी व इतर संस्थामध्ये सुमारे १७१ बालकांचे मृत्यू झाल्याप्रकरणी शासनाने १०६ संस्थांची तपासणी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही,

या विभागांतर्गतच्या राज्यातील संवेदनशील निवासी संस्थांमध्ये सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांच्याकडून सुरक्षा सेवा घेण्याच्या अनुषंगाने १०६ संस्थांचा सुरक्षा आढावा

(Security Audit) घेण्यात आला आहे.

(२) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांच्याकडून सुरक्षा आढाव्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी विविध संस्था आणि संघटनांना दत्तक देण्याबाबत**

**(२४) * ५९०५४ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडयांना स्मार्ट लुक देण्यासाठी आणि मुलामुलींची क्षमता वाढविण्यासाठी तसेच शिक्षणाची गोडी लागावी म्हणून महिला व बालविकास विभागाने विविध संस्था आणि संघटनांना अंगणवाडी दत्तक देण्याचा निर्णय दिनांक ११ जानेवारी,२०२३ रोजी व त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, लोक सहभागातून अंगणवाडी केंद्र बळकट करण्यासाठी पन्नास अंगणवाडया खाजगी संस्थांना दत्तक देण्याबाबत नुकताच सामंजस्य करार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने माहे जानेवारी, २०२३ पर्यंत एकूण किती अंगणवाडया विविध संस्था आणि संघटनांना दत्तक दिल्या व देण्यात येणार आहेत ,

(४) असल्यास, अशा अंगणवाडयांना संस्था दत्तक दिल्यानंतर तेथील अंगणवाडी सेविकांना शासनाचे सर्व लाभ अनुज्ञेय करणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन तात्काळ अंमलबजावणी होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) राज्यात अंगणवाडी दत्तक धोरण राबविण्यास शासन निर्णय दिनांक ०४.१०.२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) माहे जानेवारी २०२३ पर्यंत राज्यस्तर, जिल्हास्तर तसेच प्रकल्प स्तरांवरील प्रयत्नाने एकूण ३६५६ अंगणवाडी केंद्रांना विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता कंपनी व सामाजिक संस्था यांना दत्तक देण्यात आलेले आहे.

(४) व (५) CSR, सामाजिक संस्थेमार्फत दत्तक घेतलेल्या अंगणवाडी केंद्रामध्ये भौतिक सुविधा, शैक्षणिक सुविधा, वृध्दी संनियंत्रण साहित्याचा पुरवठा व दुरुस्ती, प्रशिक्षण व कौशल्य देणे, लाभार्थ्यांची आरोग्य तपासणीकरिता शिबीरांचे आयोजन करणे इ. सहाय्य करणेसाठीच अंगणवाडी केंद्र दत्तक देण्यात आले आहेत. दत्तक दिलेल्या अंगणवाडी केंद्रातील अंगणवाडी सेविकांचे शासनामार्फत देण्यात येणारे सर्व लाभ अनुज्ञेय व अबाधित आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील वीट कामगारांना शासनाकडून कामगारांचा दर्जा मिळण्याबाबत**

**(२५) * ५८९०१ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे**

**(जळगाव शहर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, भिवंडी, पालघर, वसई परिसरात एकूण १५ हजार वीट कामगार काम करीत असून आजपर्यंत त्यांना शासनाने कामगार हा दर्जा न दिल्याने मिळणाऱ्या सोयी-सुविधांपासून ते वंचित राहिले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत महिन्याला ४.५ कोटी रुपयांची उलाढाल होणाऱ्या या व्यवसायातील कामगार मात्र अजूनही दुर्लक्षित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यातील अनेक कामगारांना अद्याप ओळखपत्र दिली नसल्याने त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू वीट कामगारांना कामगार दर्जा देऊन त्यांना अन्य कामगारांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) हे खरे नाही.

शासनाच्या दिनांक १८.०८.२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे कारखारे अधिनियम, १९४८ अंतर्गत समावेश नसलेल्या वीट तयार करणाऱ्या आस्थापनेतील वीटभट्टी कामगारांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये नोंदणी करण्याकरीता पात्र ठरविण्यात आलेले आहे.

(३) व (४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यात ३७४ व पालघर जिल्हयात १,८९७ वीटभट्टी कामगारांची नोंदणी झालेली असून त्यांना मंडळाचे ओळखपत्र देण्यात आले आहे. तसेच अन्य वीटभट्टी कामगारांच्या नोंदणीची कार्यवाही सुरु आहे.

ठाणे व पालघर जिल्हयातील वीटभट्टी कामगारांना शैक्षणिक अर्थसहाय्य योजना, अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वाटप, अवजारे खरेदीसाठी अर्थसहाय्य तसेच मध्यान्ह भोजन व रात्रीचे भोजन वाटप या योजनांतर्गत लाभ देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास हाफकिन संस्थेने विहित वेळेत औषध पुरवठा केला नसल्याबाबत

**(२६) * ६१५७२ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास औषध व सर्जिकल साहित्य खरेदीसाठी सुमारे ७ कोटी ५८ लाख रुपयांचा निधी हाफकिन संस्थेला देऊन एक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्यापही ६ कोटी रुपयाची औषधे प्राप्त झाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास विहित वेळेत औषध पुरवठा न करणा-या हाफकिन संस्थेवर कारवाई करणेसह औषध पुरवठा वेळेवर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३)प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कढोली (ब्रु ) (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची जुनी इमारत तीन वर्षापूर्वी निर्लेखित केल्याबाबत

**(२७) * ६०८७४ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कढोली (ब्रु ) (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची जुनी इमारत तीन वर्षापूर्वी निर्लेखित करण्यात आली परंतू अद्यापही नव्या वर्गखोलीचे बांधकाम सुरु न झाल्याने येथील विद्यार्थ्यांना झाडाखालीच विद्यार्जन करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर शाळेच्या वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय,

सन २०२२-२३ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत चार वर्गखोल्या बांधण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळाली असुन सदर बांधकामाच्या निविदा प्रक्रियेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## ऐरोली (नवी मुंबई) येथील दिशा इंटरप्रायझेस या कारखान्यात लागलेल्या आगीत कामगाराचा झालेला मृत्यू

**(२८) * ५७५७५ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली (नवी मुंबई) येथील सर्व्हीस इंडस्ट्री मधील दिशा इंटरप्रायझेस रेलिंग पेपर बनविणाऱ्या कारखान्यात दिनांक ९ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीत एका महिला कामगाराचा होरपळून मृत्यू झाला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आग लागण्याची कारणे काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार मृत महिला कामगाराच्या परिवारास अर्थसाहय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) दिशा इंटरप्रायझेस,प्लॉट नं.५६, ऐरोली नाका,ऐरोली,नवी मुंबई या कंपनीमध्ये दि.०७.०१.२०२३ रोजीआग लागून एका महिला कामगाराचा मृत्यू झाला आहे.

(२) व (३) विद्युत निरिक्षक, निरीक्षण विभाग क्र.१, ठाणे यांच्या अभिप्रायानुसार कारखान्यातील ईलेक्ट्रीक थ्रीपिन स्वॉकेट मधील अंतर्गत वायरींगमुळे शॉर्ट सर्किट होऊन सदरची आग लागली असून,निरीक्षण वेळेस १०० ॲम्पीअर क्षमतेचा एम.सी.सी.बी ट्रीप झालेला आढळून आला.

सदर कारखान्यात १० पेक्षा कमी कामगार काम करीत असल्यामुळे कारखाने अधिनियम,१९४८ च्या तरतुदी लागू होत नाहीत. तसेच सदर आस्थापना महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन), २०१७ अन्वये नोंदणीकृत नाही.

सदर कारखाना मालकाने मृत महिला कामगाराच्या वारसास रूपये ८.०० लक्ष इतकी आर्थिक मदत दिली आहे. तसेच कामगार नुकसान भरपाई अधिनियम,१९२३ मधील तरतुदींनुसार मृत महिला कामगाराच्या वारसांस नुकसान भरपाई देण्यासाठी मा.कामगार न्यायालय तथा आयुक्त, कामगार नुकसान भरपाई,ठाणे यांनी दि.२१.२.२०२३ च्या पत्रान्वये कारखान्याच्या मालकांस नोटीस बजावली आहे.

सदर प्रकरणी रबाळे पोलीस ठाणे येथे फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ च्या कलम १७४ अन्वये आकस्मिक मृत्यू रजि.नं. ०३/२०२२ अन्वये नोंद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय (सिव्हील) रुग्णालयात मनुष्यबळ वाढीसाठी व स्वच्छता ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(२९) * ६०७८१ श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय (सिव्हील) रुग्णालयाच्या प्रसूती विभागात नियोजनाच्या अभावामुळे व मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे रुग्णांची गैरसोय होत असून महिला रुग्णांना बाहेर गाद्या टाकून उपचार घ्यावे लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांची गैरसोय होऊ नये तसेच महिलांना योग्य उपचार मिळण्यासाठी रुग्णालयात मनुष्यबळ वाढीसाठी व स्वच्छता राखण्यासाठी योग्य नियोजनासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही व केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) रुग्णालयात उपलब्ध मनुष्यबळाचे आधारे तसेच, बाह्यस्त्रोतांमार्फत नियमितपणे साफसफाई केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) येथे उद्भवणाऱ्या समस्याचे निराकरण करणेबाबत**

**(३०) * ५७७५२ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम),श्री. नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) अमरावती शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयात (इर्विन) रुग्णसंख्या जास्त व खाटांची संख्या कमी असल्यामुळे एकाच खाटेवर दोन-दोन रुग्णांवर उपचार केले जात असून अनेकांना जमिनीवर बेड टाकून उपचार केले जात असल्याने वाढीव ३७५ खाटांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रुग्णालय परिसरात पाणीपुरवठा करणारी मुख्य पाईपलाईन फुटल्याने अनेक विभागामध्ये पाण्याची समस्या निर्माण झाली असुन रुग्णांची, कर्मचारी, डॉक्टर तसेच इतरांचीही पाण्याअभावी गैरसोय होत असल्याचे दिनांक ४ जानेवारी,२०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या रुग्णालयात एचआयव्ही बाधितांसाठी विषाणू प्रतिबंधक (एआरटी ) गोळयांचा तुटवडा निर्माण झाला असल्याने एचआयव्ही बाधितांचे आरोग्य धोक्यात आले असुन केंद्र शासनाकडून पुरविण्यात येणाऱ्या

गोळयांचा गत तीन महिन्यापासून पूरवठा झालेला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या दुस-या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रुग्णालयात कॅन्सरग्रस्त रुग्णांवरील उपचारासाठी केमोथेरेपी युनिटमध्ये वर्षभरापासून औषधांचा तुटवडा आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या रुग्णालयातील खाटांची संख्या वाढविणे,पाणीपूरवठा सुरळीत करणे, डीपीडीसी फंडातून एचआयव्ही बाधितांसाठी विषाणू प्रतिबंधक (एआरटी) गोळया उपलब्ध करणेसह किमोथेरपीकरिता आवश्यक औषधांचा पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशतः खरे आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती या रुग्णालयाचे ३७९ खाटांवरुन ७५० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.
(२) अंशतः खरे आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील जुनी पाण्याची टाकी पाडण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती यांचेद्वारे करण्यात आले होते. त्या दरम्यान जूनी असलेली पाईपलाईन काही ठिकाणी फुटलेली आढळून आली त्यामुळे रुग्णालयास पाणीपुरवठा बंद होता, परंतु रुग्णांची गैरसोय होवू नये, म्हणून खाजगी टॅंकरद्वारे रुग्णालयास पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे, त्यामुळे कोणत्याही विभागात रुग्णांची पाण्याअभावी गैरसोय झाली नाही.
(३) नाही.
(४) नाही.
(५) रुग्णालयास आवश्यक असलेली औषध व साहित्य सामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती यांचेकडून एचआयव्ही बाधितांसाठी (एआरटी) व कर्करोग ग्रस्तासाठी किमोथेरपी साठी लागणारी औषधे स्थानिक स्तरावरुन घेण्यात आलेली आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिगवण (जि. पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयातील सर्व तांत्रिक सेवा पूर्ण क्षमतेने सुरु करणेसह औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करणेबाबत

**(३१) * ५६५२३ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिगवण (जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयात जीवनावश्यक औषधांचा पुरवठा अपुऱ्या प्रमाणात होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयातील एक्सरे मशीन, रक्त तपासणी लॅब तसेच रुग्णसेवेच्या बऱ्याच इतर यंत्रणा दीर्घकाळापासून बंद असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या रुग्णालयातील सर्व तांत्रिक सेवा पूर्ण क्षमतेने सुरु करणेसह औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) ग्रामीण रुग्णालय, भिगवण जि. पुणे येथील क्ष-किरण तंत्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ही रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. रक्त तपासणीचे काम हे (HLL) बाहययंत्रणेद्वारे करण्यात येत आहे. तसेच

रुग्णालयांना आवश्यक असलेली औषधी व साहित्य सामुग्री ही जिल्हा स्तरावरुन आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## शासकीय मनोरुग्णालयांमध्ये पुरेशा प्रमाणात मानसोपचार तज्ञ अथवा समुपदेशक उपलब्ध नसल्याबाबत

**(३२) * ५९९१४ श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय मनोरुग्णालयांमध्ये पुरेशा प्रमाणात मानसोपचार तज्ञ अथवा समुपदेशक उपलब्ध नसल्यामुळे मनोरुग्णाना उपचार व योग्य मार्गदर्शन मिळू शकत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामाजिक दृष्टया अतिशय संवेदनशील व महत्वाच्या असणाऱ्या या विषयामधील मानसोपचारतज्ञांची शासकीय रुग्णालयांतील बहुतांश पदे अद्यापही भरण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, मानसिक आरोग्य ही सार्वजनिक महत्वाची बाब असल्याने या क्षेत्रातील वाढत्या गरजा लक्षात घेता सदर पदे निश्चित किती कालावधीत भरण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यात ठाणे, पुणे, रत्नागिरी व नागपूर या ठिकाणी पूर्ण क्षमतेने मनोरुग्णालये कार्यान्वित आहेत. या ४ मनोरुग्णालयांमध्ये मनोविकृती विशेषज्ञ वर्ग-१ ची ६ पदे भरलेली आहेत. तसेच जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत ७ मनोविकृतीतज्ञ उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. मनोरुग्णालयातील इतर वैद्यकीय अधिकारी गट-अ यांच्यापैकी काही वैद्यकीय अधिकारी हे मनोविकृती तज्ञ आहेत. मनोविकृती सामाजिक कार्यकर्त्यांच्या एकूण मंजूर २७ पदांपैकी २३ पदे भरलेली असून त्यांच्यामार्फत मनोरुग्णालयांतील मनोरुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येते.
(३) सन २०२१ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मनोविकृतीतज्ञांच्या एकूण १८ उमेदवारांच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या असून सदर उमेदवारांना पदस्थापना देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात जलजीवन मिशन अंतर्गत नळजोडणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत

**(३३) * ५६८४७ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जल जीवन मिशन अंतर्गत ३४ जिल्हयात माहे मार्च,२०२३ अखेरपर्यंत २७ लाख ३६ हजार ७७५ नळजोडणी देण्याचे प्रस्तावित करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी आतापर्यंत फक्त ४ लाख ३८ हजार ३२९ नळजोडणी करण्यात आल्या असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच जलजीवन मिशनसाठी भरावयाच्या अनामत रकमेत देखील वाढ करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नळ जोडण्यांचे उद्दिष्ट तसेच अनामत रकमेची दरवाढ मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) जल जीवन मिशन अंतर्गत राज्यात सन २०२२-२०२३ वर्षामध्ये माहे फेब्रुवारी,२०२३ अखेरपर्यंत ५ लाख ९८ हजार १५३ नळ जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.
(३) जल जीवन मिशन अंतर्गत नळ जोडणीसाठी अनामत रक्कम आकारण्यात येत नाही. तथापि, नळ जोडणीसाठी आकारावयाची रक्कम ग्रामपंचायतीमार्फत निश्चित करण्यात येते.
(४) व (५) राज्यातील पाणी पुरवठा योजनांच्या कामांची संख्या जास्त असल्याने या कामासाठी निविदा भरण्यासाठी कंत्राटदार विलंबाने उपलब्ध झाल्याने, निविदा प्रकरणी न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्याने तसेच दरसूचीमध्ये वेळोवेळी वाढ झाल्यामुळे केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात आलेल्या सन २०२२-२०२३ च्या नळ जोडणी उद्दिष्टामध्ये बदल करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे.
जल जीवन मिशन अंतर्गत अनामत रक्कम आकारण्यात येत नसल्याने दरवाढ मागे घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात न्युमोनियाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(३४) * ५६९०० श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात सन २०२२ मध्ये न्युमोनिया चे रुग्ण मोठया प्रमाणात आढळून आले ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी २०२२ ते दिनांक ३१ डिसेंबर २०२२ रोजी या कालावधीत या आजाराने बाधीत व मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या किती आहे,
(३) असल्यास, या आजारामुळे बाधित झालेल्या रुग्णांना तत्काळ वैद्यकीय सहाय्य मिळणेबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली,
(४) असल्यास, न्युमोनियाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने तत्काळ प्रतिबंधात्मक कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) केंद्र शासनाच्या Integrated Health Information Platform पोर्टल वरील प्राप्त महितीनुसार पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात सन २०२२ मध्ये Severe Acute Respiratory Infection (SARI) च्या ५०७ रुग्णांची नोंद असुन त्यापैकी ४ रुग्णांची मृत्युची नोंद झालेली आहे.

(३) केंद्र व राज्य शासनाच्या वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील साथ रोग रूग्ण नियंत्रणासाठी विविध प्रकारे जन जागृती करण्यात आली.

न्यूमोनिया रूग्णांच्या उपचारासाठी पुणे महानगरपालिकेव्दारे विविध रूगणालयामध्ये ICU/NICU, VENTILATOR इत्यादी सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

न्युमोनिया रूग्णांच्या उपचारासाठी पुणे महानगरपालिकेव्दारे विविध रूग्णालयांमध्ये व बाह्य रूग्ण विभागांमध्ये फ्लू क्लिनिक स्थापन करण्यात आले व तेथे ताप, खोकला असलेल्या रूग्णांचे उपचार मोफत करण्यात आले.

अत्यावस्थ रूग्णाला उपचारासाठी दाखल करण्याकरीता नायडू संसर्गजन्य रोग रूग्णालय येथे १०० खाटा आजाराचे अत्यावस्थ रूग्ण दाखल करून घेणे व रूग्ण डिस्चार्ज करताना पैशाअभावी रूग्णाची अडवणूक न करणे याबाबत लेखी सूचना देण्यात आल्या होत्या.

सर्व आरोग्य संस्थांमध्ये न्युमोनियाच्या निदानासाठी वैद्यकीय अधिका-यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. निदानासाठी आवश्यक उपकरणे व उपचारासाठी आवश्यक औषधे पुरविण्यात आली.

(४) न्यूमोनियाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून कोव्हीड लसीकरण, एच १, एन १ लसीकरण, न्यूमोकोकल लसीकरण, गोवर लसीकरण इत्यादी नियमित लसीकरण व औषधोपचारामुळे न्यूमोनिया आजाराचे नियंत्रण करण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई :** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.